# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(दुपार )

जा.क्र. ३६७/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक:—३०/०६/२०१६.

**१) अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार केल्याने गुन्हा नोंद—:**

दिनांक २३/०५/२०१६ ते दिनांक १५/६/२०१६ रोजी दरम्यान यातील फिर्यादी यांच्या मुली स्व:ताचे घरी हजर असतांना विधीसंघर्षग्रस्त बालक याने फिर्यादीच्या मुलींना खेळण्यास जावु असे म्हणुन, त्यांना आपले घरी नेवुन फिर्यादीची पीडीत मुलगी वय ०६ वर्ष हीला एकटीला दुस—या खोलीत नेवून तिचेवर लैंगिक अत्याचार केला. असे फिर्यादी ही आपले पती सोबत पिडीत मुलीला घेवुन येवुन आज रोजी पोलीस स्टेशनला रिपोर्ट दिल्याने व डॉक्टर परीक्षण अहवालावरून पोलीस स्टेशन मोहाडी येथे कलम ३७६ भादंवि सहकलम ६ बाललैंगीक अत्याचार संरक्षण अधिनीयम २०१२ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. तपास सपोनी चौधरी पो.स्टे. मोहाडी हे करीत आहेत.

**२) मारण्यापीटण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद. :—**

दिनांक २९/०६/२०१६ चे ०४.३० ते ०५.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी ही मुख्याधापीका या पदावर कार्यरत असुन यातील आरोपी हा शाळा व्यवस्थापन समीतीचा व्यवस्थपक आहे. यातील आरोपी हा शाळेत येवुन शाळेत काम करणारी स्वयंपाकीन व मदतनिस तसेच फिर्यादी व शिक्षीका यांना तुम्ही शाळेत राहायचे नाही. येथुन चालते व्हा असे बोलुन फिर्यादीस फाडुन टाकीन तु माझे काय करशिल, अशी धमकी देवुन अंगावर मारण्यास धावला. असे फिर्यादीचे लेखी रीपोर्ट वरून पोलीस स्टेशन दिघोरी येथे कलम ३५३, ५०६ भादंवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. तपास पोउपनी मेश्राम पो.स्टे. दिघोरी हे करीत आहेत.

**३) अश्लील शब्दात शिवीगाळ करून जिवाने मारण्याची धमकी दिली—:**

दिनांक २९/०६/२०१६ चे १७.०० वा.दरम्यान फिर्यादी कु. करिश्मा प्रभूदास डोये वय २० वर्ष ही आपल्या बहीनी सोबत पोलीस स्टेशन आधंळगाव येथिल महिला समुपदेशन केंद्र येथे आली असतांना आरोपीने फिर्यादीचे नाव घेवुन अश्लील शब्दात शिवीगाळ करून जिवानीशि मारण्याची धमकी दिली. असे फिर्यादीचे लेखी रीपोर्ट वरून पोलीस स्टेशन आंधळगाव येथे कलम २९४,५०६ भादंवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. तपास सपोनी झोटींग पो.स्टे. आधंळगाव हे करीत आहेत.

**४) मोटार वाहन कायद्याखाली कारवाई. :—**

दिनांक २९/०६/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण १३६ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवासी वाहतुक करणा—यांवर ०२ केसस, तिन सिटर वाहनांवरती १२ केसेस व इतर वाहनांवरती १२२ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

(के.एच.धात्रक)
प्रभारी. पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा.
दुरध्वनी.क्र. ९८२३६३७२२०

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.